# सुप्रजा संस्कार

राष्ट्रीय चर्चासत्र

॥ सुप्रजनन अर्थात माता-बाल संगोपन ॥

## गर्भसंस्कार

### एक सुंदर प्रवास

- गर्भसंस्कार शास्त्र
- तयारी – शरीर–मनाची
- कौटुंबिक सहभाग
- सगर्भावस्था प्रवासाच्या ३ पायऱ्या
- तयारी बाळंतपणाची
- सांगता प्रवासाची

## कार्यक्रमाची रूपरेषा

- उद्घाटन समारंभ - हस्ते श्री. भैय्याजी जोशी, सरकार्यवाह, रा.स्व.सं.
- सुप्रजा संस्कार-आढावा व गोषवारा - डॉ. अभय कुलकर्णी, सचिव, आयुर्वेद सेवा संघ, नाशिक
- सुप्रजा संस्कार-रुग्णानुभव चर्चा - डॉ. सीमा मेहेरे, वाय.एम.टी. आयुर्वेद महाविद्यालय
- बीजांकुरण ते सुलभ प्रसुति, एक आनंदयात्रा - डॉ. मधुरा कुलकर्णी, आरोग्य भारती
- गर्भारपणातील आहार व जीवनशैली - डॉ. ज्योती जगताप, वाय.एम.टी. आयुर्वेद महाविद्यालय
- सुप्रजा संस्कार-संशोधन व प्रत्यक्ष अनुभव - डॉ. हितेश जानी

**कार्यशाळेचे स्थान :**

महाराष्ट्र सेवा संघ हॉल,
अपना बाजारच्या वर, जवाहरलाल नेहरू मार्ग,
मुलुंड (प.), मुंबई - ४०००८०
दिनांक २२ डिसेंबर २०१६ रोजी १०.०० वा.

**कार्यशाळेच्या नोंदणीसाठी संपर्क :**

श्री. निलेश सिंघानिया, डॉ. मधुरा कुलकर्णी
९३२२२५४४३०/८४४६८७११७४/९८६७१४००१४/९८९२४४४९२४
ई-मेल : arogyabharati.konkan@gmail.com, absuprajasanskar@gmail.com

**नोंदणी शुल्क - ₹ २००/-**

**आयोजक**

## आरोग्य भारती

**महाराष्ट्र सेवा संघ, मुलुंड**

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ**
**एम.ई.एस. आयुर्वेद महाविद्यालय, चिपळूण**
**जी. डी. पोळ फाउन्डेशनचे वाय.एम.टी. आयुर्वेद महाविद्यालय, खारघर**

## गर्भसंस्कार शास्त्र - सुप्रजा निर्माण करणारे शास्त्र

बाळाचा जन्म हा कुटुंबातील सर्वाधिक आनंदाचा क्षण, नवनिर्मितीच्या शक्तीचा उत्कृष्ट आविष्कार... तो क्षण समाधानाचा ठरावा यासाठी शास्त्रीयदृष्ट्या मदत करतो तो संस्कार म्हणजेच गर्भसंस्कार. विवाह म्हणजेच दोन कुटुंबांचे स्नेहमिलन व त्यातील अत्युच्च फळ म्हणजेच गर्भधारणा. कुटुंबातील स्त्री-पुरुषातील दोष, आजार निघून नवीन गुणांनी युक्त सक्षम, बुद्धीमान, प्रगल्भ संतती निर्माण होणे हेच गर्भसंस्काराचे शास्त्रोक्त फलित !

**वयं एको गुणी पुत्रो न च मूर्ख शतान्थपि ।**

## तयारी - शरीर-मनाची

शुद्धीशिवाय सिद्धी नाही ! भावी आई-वडिलांच्या शरीरातील पेशी-पेशींची स्वच्छता, योग्य तपासण्या व अनुवांशिक आजार असल्यास त्याचे निराकरण महत्त्वाचे ! मन प्रसन्न ठेवण्यासाठी शरीर शुद्धीसह नाडी शुद्धी, प्राणायाम, ध्यान, योगसाधना अधिक महत्त्वाची ठरते. नियोजन उत्कृष्ट असेल तर कृती उाम होते व फळही चांगले मिळते.

**शुद्ध बीजापोटी, फळे रसाळ गोमटी !**

## कौटुंबिक सहभाग

गर्भधारणेपूर्वीची पायरी ते गर्भधारणेतील ३ पायऱ्या, बाळंतपण व त्यानंतरचा काळ. या कालावधीत स्त्री शरीर-मन-भावना यात खूप बदल घडत असतात. चांगले अपत्य जन्माला यावे यासाठी स्त्रीच्या बरोबर तिचा पती व कुटुंबियांनी तिला खंबीर आधार देणे व घरातील वातावरण तयार करणे याचे महत्त्व खूप मोठे आहे.

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवत: ।**

## सगर्भावस्था प्रवासाच्या ३ पायऱ्या

गर्भधारणेपूर्वी ३ महिने व गर्भधारणा झाल्यावर ३/३ महिन्यांच्या पायऱ्या समजल्या तर गर्भारपणाच्या सुंदर प्रवासाचे टप्पे सहजी पार पडतात. याला आधार हवा तो योग्य आहार, जीवनशैलीचे नियोजन, वनस्पती द्रव्यांचा उपयोग, योगसाधना, मंत्रोच्चारण, संगीत, ज्योतिषशास्त्र व आध्यात्मिक साधना इ. सर्वच गोष्टींचा ! ती नीट समजून घेणे महत्त्वाचे असते. प्रयत्नपूर्वक स्त्रीचे शरीर-मन सांभाळले तर प्रवास सुखकर होतो.

**रसजं पुरुषं विज्ञात्, रसं रक्षेत प्रयत्नत: ।**

## तयारी बाळंतपणाची

पण लावून स्वयंवर जिंकण्यासाठी मेहनत होती. असाच पण चांगले बाळ होण्यासाठी लागतो. त्याच्या अटी मात्र फार अवघड नाहीत. पण शास्त्रोक्त डोळसपणा हवा ! प्रत्यक्ष प्रसुतीचे टप्पे समजून घेणे, श्वासोच्छ्श्वासावरती नियंत्रण आणणे, पंचकर्माचा सुयोग्य वापर व प्रसुतीपूर्वीची योग्य तयारी या सर्व गोष्टींचा यात समावेश होतो.

**बली पुरुषकारो हि, दैवमप्यतिवर्तते ।**

## सांगता प्रवासाची

बीज अंकुरण्यापूर्वी जमिनीची मशागत, पेरणी, योग्य खतपाणी, वातावरण निर्मिती ते फलप्राप्ती हा सुंदर प्रवास निसर्गात बाह्यत: बघायला मिळतो. आतल्या आत स्त्री शरीरही या नवनिर्मितीच्या सोहळ्याचे साक्षीदार असते. हा प्रवास बाळ झाल्यावरही स्त्री शरीर-मनाची काळजी, स्तन्य निर्मिती व बाळाला या दूधाद्वारे परिपूर्ण पोषण, मेंदूची वाढ इथपर्यंत रेंगाळतो ! ही सांगताच परिपूर्तीची अत्युच्च सीमा ठरते.

**जन्म बाळाचा - पुनर्जन्म आईचा,**
**समर्थ भावी पिढीच्या ध्यासाचा !!**